# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन विभागातर्फे ६० नविन मार्ग सुरु करण्याबाबत

**(१) ९४५६ (०४-०४-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन विभागातर्फे ६० नविन मार्ग सुरु करण्यासाठी रिजनल ट्रान्सपोर्ट ऑथेरिटी, ठाणे यांचेकडून परवानगी मिळणेसाठी माहे जानेवारी, २०१४ मध्ये व तदपूर्वी मागील १ वर्षापासून प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील वाढती लोकसंख्या विचारात घेऊन वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन विभागातर्फे पाठविण्यात आलेल्या सदरहू प्रस्तावास विनाविलंब मंजूरी मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०७-२०१६) :**(१) होय, तथापि सदर प्रस्तावित मार्ग हे मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण क्षेत्राबाहेरील व राज्या बाहेरील देखील आहेत.

(२) व (३) मुंबई महानगर क्षेत्रातील सर्व महानगरपालिका परिवहन उपक्रमांना मुंबई महानगर क्षेत्रात सर्वत्र प्रवासी सेवा देण्यास मंजूरी देण्यात आली आहे. फक्त त्या सेवेची सुरुवात किंवा शेवट त्यांच्या स्वत:च्या हद्दीत असणे आवश्यक आहे. त्यानुसार परिवहन उपक्रमांनी संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून परवाने घ्यावेत, असा निर्णय मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाने घेतलेला आहे. तसेच दि. ०५ ऑगस्ट, २०१० च्या प्राधिकरणाच्या बैठकीत वसई-विरार महानगरपालिका व नालासोपारा-नवघर-माणिकपूर नगरपरिषद यांच्या संयुक्त परिवहन सेवेत फक्त शहरी क्षेत्रात प्रवासी वाहतुक करण्यासाठी ५० खाजगी बसेस भाडे करारावर घेण्यास व पुरवठादाराशी योग्य करार करुन काही अटींचे अधीन राहून परवानगी दिली आहे. तसेच वसई-विरार शहर महानरपालिका परिवहन उपक्रमास एकूण ४८ मार्गांवर टप्पा वाहतूकीचे

परवाने मंजूर केले आहेत. मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण क्षेत्राबाहेरील व राज्याबाहेरील मार्ग परवाने देण्याचे अधिकार मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणास नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## टॅक्सी रिक्षाचे दर कमी करण्याबाबत

**(२) १४२२८ (१०-०४-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एप्रिल, २०१४ पासून पेट्रोल व डिझेलचे दर पाच वेळा कमी होऊन पेट्रोलचा दर रु.८१ वरुन रु.६१.५० पर्यंत कमी झाले व डिझेलचा दर रु. ६४ वरुन ५०.५० पर्यंत कमी झाल्यामुळे टॅक्सी व रिक्षाचे दर कमी करुन प्रवाशांना दिलासा द्यावा, अशा मागणीचे पत्र सहकार टॅक्सी-रिक्षा मालक-चालक संघटनेचे अध्यक्ष श्री.रोहिदास लोखंडे यांनी फेब्रुवारी, २०१५ च्या पहिल्या पंधरवड्यात मा.मुख्यमंत्री यांना दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टॅक्सी रिक्षाचे दर कमी करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे,

(३) असल्यास, टॅक्सी-रिक्षाचे दर कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) सध्या रिक्षा-टॅक्सीचे भाडेदर हकीम समितीच्या सुत्रानुसार ठरविण्यात येतोत. या सुत्रामध्ये दर ठरविताना इंधनाच्या दराबरोबरच रिक्षा-टॅक्सीची अलीकडची किंमत, विमा, सर्व प्रकारचे कर, ग्राहक निर्देशांक इत्यादी बाबींचा विचार केला जातो. या सुत्रानुसार मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या दि. ११ मे, २०१५ रोजीच्या बैठकीत रिक्षा-टॅक्सीचे नवे भाडेदर निश्चित करण्यात आले.

तद्नंतर हकीम समितीच्या सुत्राचा आढावा घेण्यासाठी नवीन समिती गठित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील पेढी नदी जवळील भातकुली गावातील टेकडीपुरा व इतर ठिकाणचे व नदीकाठावरील ग्रामस्थांचे पुर्नवसन करणेबाबत

**(३) १६०५८ (०८-०३-२०१५). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील पेढी नदी काठाजवळील भातकुली गावातील टेकडीपुरा व इतर ठिकाणचे ग्रामस्थांचे त्वरित पुर्नवसन करण्यात यावे, तसेच नदीपात्राचे सरळीकरण, लेंडीनाल्याचे खोलीकरण व लेंडी नाल्याला पुरसंरक्षण भितींचे बांधकाम करणे भातकुली तहसिलदारामार्फत अमरावती जिल्हाधिकाऱ्याना दिनांक २५ फेब्रुवारी, २०१५ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०७-२०१६) :**(१) व (२) सदर निवेदन दिनांक २३.०४.२०१५ रोजी जिल्हाधिकारी अमरावती कार्यालयास प्राप्त झाले असून पुढील कार्यवाहीस्तव ते कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग, अमरावती यांचेकडे पाठविण्यात आलेले आहे. याबाबत प्राधान्याने काम करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपुर जिल्ह्यातील सावली येथे एस.टी. महामंडळाने बांधकाम करण्यासाठीचा पाठविलेल्या प्रस्तावास मंजूरी मिळालेली नसल्याबाबत**

**(४) १६६४७ (०६-०८-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावली (जि.चंदपुर) येथे एस.टी. महामंडळाने बांधकाम करण्यासाठीचा प्रस्ताव दिनांक ३० ऑक्टोबर, २०१४ रोजी विभागीय नियंत्रक, एस.टी. महामंडळ, चंद्रपुर यांनी महाव्यवस्थापक (वाहतूक) राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांच्याकडे पाठविलेला असतांना अद्यापही सदर प्रस्तावास मंजूरी मिळाली नसल्याची माहिती दिनांक २४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुका मुख्यालय असलेल्या सावली येथे एस.टी. महामंडळाने प्रवासी निवारा चंद्रपुर-गडचिरोली मार्गावरील रस्त्याच्या बाजूलाच असल्यामुळे अनेकदा अपघात होत असल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सावली येथे बसस्थानकाचे बांधकाम करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी परिवहन मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सावली येथे बसस्थानकाचे बांधकाम त्वरित करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.

(४) सावली येथील बसस्थानकाकरीता उपलब्ध करुन दिलेली जागा तलावाची असल्याने बसस्थानकाच्या निकषाप्रमाणे जागा प्राप्त करुन घेण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शालेय विद्यार्थ्यांना ने-आण करणाऱ्या राज्यातील प्रत्येक बससाठी बस मालकांना पथकरामुळे दरमहा सुमारे १३ हजार रुपयांचा भुर्दंड सहन करावा लागत असल्याबाबत**

**(५) १६७४३ (११-०८-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय विद्यार्थ्यांना ने-आण करणाऱ्या राज्यातील प्रत्येक बससाठी बस मालकांना पथकरामुळे दरमहा सुमारे १३ हजार रुपयांचा भुर्दंड सहन करावा लागत असल्याने शालेय विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणाऱ्या बस भाड्यात माहे जून २०१५ पासून दरमहा ३०० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय खाजगी बस गाड्यांच्या संघटनांनी घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या बस वाहतुकीचा वाढीव बस भाडे कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१६) :**(१) अशा आशयाचे वृत्त दैनिक “हिंदुस्तान टाईम्स” च्या दि. १३ मे, २०१५ रोजीच्या आवृत्तीमध्ये प्रसिध्द झाले होते.
(२) शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या बसचे भाडे शासन स्तरावरुन ठरवून दिले जात नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आलापल्ली हे गाव मुख्य रस्त्यावर असून बसस्थानकाकरिता आरक्षित असलेल्या जागेवर बसस्थानक नसल्याबाबत**

**(६) २२३४२ (०६-०८-२०१५). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य महामंडळ अंतर्गत आलापल्ली हे गाव मुख्य रस्त्यावर असून येथे बसस्थानकाकरिता आरक्षित असलेल्या जागेवर बसस्थानक अद्याप बांधण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी बसस्थानक बांधण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) आलापल्ली येथील बसस्थानकाकरीता आरक्षित असलेली जागा अपूरी असल्याने बसस्थानकाकरीता आवश्यक असलेली जागा प्राप्त करुन घेण्याबाबतची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील टॅक्सी व रिक्षाच्या भाड्यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने हकीम समितीच्या अहवालातील शिफारशीवर पुर्नविचार करण्याबाबत

**(७) २५७१३ (०८-०९-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील टॅक्सी व रिक्षाच्या भाड्यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने हकीम समितीच्या अहवालातील शिफारशीवर पुर्नविचार करुन बदलेल्या परिस्थितीनुसार मा.उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायधिशांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) अस ल्यास, त्यानुसार त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्रिसदस्यीय समिती नियुक्त करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१६) :**(१), (२) व (३) सध्या रिक्षा -टॅक्सीचे भाडेदर हकीम समितीच्या सुत्रानुसार ठरविण्यात येतात. या सुत्रामध्ये दर ठरविताना इंधनाच्या दराबरोबरच रिक्षा-टॅक्सींची अलीकडची किंमत, विम, सर्व प्रकारचे कर, ग्राहक निर्देशांक इत्यादी बाबींचा विचार केला जातो. हकीम समितीच्या सुत्राचा आढावा घेण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशंच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यास शासनाने मान्यता दिली असून सद्यस्थितीत प्रस्तूत समितीचे अध्यक्ष नियुक्त करण्यासाठी मा.उच्च न्यायालयास विनंती करण्यात आली आहे.

---

## भिवंडी (जि.ठाणे) येथील ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेतून कर्ज घेऊन पावर ट्रिलर खरेदी केले असून या शेतकऱ्यांना शासकीय अनुदान न मिळाल्याबाबत

**(८) २५९०२ (१९-०४-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील ५०० शेतकऱ्यांनी ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेतून कर्ज घेऊन पावर ट्रिलर खरेदी केले असून या शेतकऱ्यांना मिळणारे शासकीय अनुदान पाच वर्षे होवून अद्याप मिळाले नाही याबाबत भिवंडी पंचायत समितीचे सभापतींनी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी कली आहे काय, तसेच चौकशीत काय आढळून आले त्यानुसार याप्रकरणी विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच शेतकऱ्यांना तातडीने अनुदान देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१६) :**(१) प्रस्तुत प्रकरणी किजल्हाधिकारी, ठाणे यांच्यकडे लेखी तक्रार केल्याचे आढळून आले नाही. तथापि, सदर प्रकरणी माजी सभापती, पंचायत समिती, भिंवडी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांना दि.२१.४.२०१५ च्या पत्रान्वये निवेदन दिले आहे.

(२) व (३) कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत अनुदानाचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी कृषी औजारे खरेदी करण्यापूर्वी पंचायत समितीची पूर्वसंमती घेणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे सदर योजना उपलब्ध निधीच्या मर्यादेतच राबविणे क्रमप्राप्त असते. त्यामुळे जिल्ह्यांना दिलेल्या लक्षांकांव्यतिरिक्त औजारांची वाढीव खरेदी केलेल्या सर्व शेतकऱ्यांना अनुदान देणे शक्य होत नाही.

ठाणे जिल्ह्यातील १३४६ शेतकऱ्यांनी सन २०११-१२ ते २०१३-१४ या कालावधीमध्ये पंचायत समितीकडे पूर्वसंमतीसाठी रितसर अर्ज न करता, परस्पर महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्या. या संस्थेकडून पॉवर टिलर खरेदी केले असल्यामुळे, सदर शेतकऱ्यांना अनुदान अनुज्ञेय नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिन्नर बस स्थानकावरून जुन्या अपंग व्यावसायिकांना नवीन बस स्थानकात हक्काची व्यावसायिक जागा मिळणेबाबत

**(९) २८८८२ (१३-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९५ अपंग हक्क पुनर्वसन व संरक्षण आणि संपूर्ण सहभाग कायद्यानुसार सिन्नर बस स्थानकावरून जुन्या अपंग व्यावसायिकांना नवीन बस स्थानकात हक्काची व्यावसायिक जागा मिळणे बाबत विधानसभा सदस्य अचलपूर यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिन्नर बस स्थानकावरून जुन्या अपंग व्यावसायिकांना नवीन बस स्थानकात हक्काची व्यावसायिक जागा मिळणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०७-२०१६) :**(१) होय.

(२) सिन्नर बसस्थानक हे बी.ओ.टी. तत्वावर दि.१०.१०.२०११ पासून कार्यान्वित झालेले असून राज्य परिवहन बसस्थानकावरील वाणिज्य आस्थापनाच्या कार्यपध्दतीनुसार बी.ओ.टी. तत्वावर बांधण्यात येणाऱ्या बसस्थानकावर जुन्या बसस्थानकावरील वाणिज्य आस्थापनाधारकांना आस्थापना वितरीत करता येत नाही.

सद्यस्थितीत सदर आस्थापनाची संबंधित बाब नाशिक जिल्हा सत्र न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्याकारणाने त्याबाबत कार्यवाही करता येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राष्ट्रीय फलोत्पादन अभियान सन २०१३-१४ अंतर्गत यांत्रिकीकरण घटकांतर्गत प्रस्तावांचे अनुदान अप्राप्त असल्याबाबत

**(१०) २८९१३ (१३-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी अधिकारी तालुका चांदूरबाजार जिल्हा अमरावती यांच्या कार्यालयाकडील राष्ट्रीय फलोत्पादन अभियान सन २०१३-१४ अंतर्गत यांत्रिकीकरण घटकांअंतर्गत एकूण ११२ प्रस्तावांपैकी ३७ प्रस्तावांचे अनुदान अद्यापि अप्राप्त आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदान अप्राप्त असण्याची विविक्षित कारणे काय आहेत,

(३) याबाबत उर्वरित ३७ प्रस्तावाना तातडीने अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

११२ प्रस्तावांपैकी १०० प्रस्तावांना अनुदान देण्यात आले असून केवळ १२ प्रस्ताव प्रलंबित आहेत.

(२) सन २०१३-१४ मध्ये दिलेल्या लक्षांकापेक्षा जास्त प्रस्ताव स्विकारण्यात आल्यामुळे काही प्रस्तावांना अनुदान वाटप करता आले नाही.

(३) व (४) उर्वरीत १२ प्रस्ताव का प्रलंबित राहिले तसेच त्यांना पूर्वसंमती देण्यात आली होती काय, याबबत चौकशी करण्याच्या सूचना विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती यांना देण्यात आल्या आहेत.

---

**मौलाना आझाद अल्पसंख्यांक विकास महामंडळांतर्फे गरजूंसाठी आवश्यक ती माहिती व सहकार्य संबंधित महामंडळाचे अधिकारी/कर्मचारी करीत नसल्याबाबत**

**(११) २९१३२ (१३-०१-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मौलाना आझाद अल्पसंख्यांक विकास महामंडळांतर्फे गरजूंसाठी आवश्यक ती माहिती व सहकार्य करीत नसल्याबाबतची कैफियत मुस्लीम अल्पसंख्यांक समुदायातील होतकरू युवकांनी त्यांच्या भावी उदाराकरिता शैक्षणिक, सामाजिक, रोजगार व स्वयंरोजगार विषयक बाबींसाठी आवश्यक ती माहिती वा सहकार्य संबंधित महामंडळाचे अधिकारी/कर्मचारी देत नसल्याची कैफियत मा. मंत्री (अल्पसंख्यांक विकास), राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास), तसेच संबंधित महामंडळाचे व्यवस्थापन यांच्याकडे माहे सप्टेंबर २०१५ वा त्यादरम्यान  निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त बाब (१) च्या अनुषंगाने महामंडळातर्फे वा मंत्रालयीन विभागामार्फत तसेच संबंधित जिल्ह्याचे अल्पसंख्यांक विकास अधिकारी यांच्याकडे लेखीनिवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशीअंती कोणती निर्णायक कार्यवाही वा उपाययोजना तातडीने कार्यान्वित केली वा करण्याचे प्रस्तावित केले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) होय.

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या मुख्यालयात तसेच जिल्हा कार्यालयासाठी असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्यामार्फत महामंडळाच्या योजनांसंबंधी आवश्यक असलेली माहिती तसेच सहकार्य/मार्गदर्शन गरजू व्यक्तींना करण्यात यावे, अशा सूचना महामंडळामार्फत देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या विभागात पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याबाबत**

**(१२) २९२५८ (१८-०१-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या विभागात पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे माहे ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यातील सुमारे २५ परवाने अद्याप नागरिकांना न मिळाल्यामुळे सुशिक्षित बेकार तरुणांवर उपासमारीची वेळ ओढवली असल्याचे दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१६)** :(१) व (२) प्रादेशिक परिवहन कार्यालयात पुरेसा कर्मचारी वर्ग नसलमुळे नागरिकांना परवाने न मिळाल्याचे वृत्त दैनिक पुढारीमध्ये दि.१६.९.२०१५ रोजी प्रसिध्द झाले होते. सदर प्रलंबित कामकाजाचा निपटारा करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात दुष्काळी परिस्थितीमुळे डाळींब बागा जगविण्याबाबत**

**(१३) २९४०६ (१५-०१-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात सध्या सततच्या दुष्काळी परिस्थितीमुळे डाळींब बागा जगविण्यासाठी शेतक-यांना खूप मोठी अडचणी निर्माण झाली असल्याने येथील शेतकरी अनुदानाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक छोट्या मोठ्या शेतक-यांनी आपल्या शेतामध्ये ठिबक सिंचनाव्दारे डाळींब पिकाची लागवड केली. परंतु यावर्षी पाऊस नसल्याने डाळींब बागा सुकुन जात असून सदरील बागा जगविण्यासाठी टँकरने पाणीपुरवठा करण्यात यावा अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दुष्काळ परिस्थितीचा सामना करण्याकरीता शासनाने शेतक-यांना मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६)** :(१) व (२) हे खरे नाही.
सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील, ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी जाहीर करण्यात आलेल्या गावांमध्ये मंगळवेढा तालुक्यातील गावांचा समावेश नाही.
(३) सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामातील, ५० पैशांपेक्ष कमी पैसेवारी जाहीर करण्यात आलेल्या गावांमध्ये मंगळवेढा तालुक्यातील ८१ गावांचा समावेश आहे. रब्बी हंगामातील ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांमध्ये महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय-२०१६/प्र.क्र.२१९/म-७ दि.२७.०४.२०१६ अन्वये विविध उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शेगाव-खामगाव-जालना रेल्वे मार्गाचा प्रश्न प्रलंबित असल्याबाबत**

**(१४) २९७०७ (२१-०१-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगाव - खामगाव - जालना रेल्वे मार्गाचा प्रश्न प्रलंबित असून बुलडाणा जिल्ह्यातील नागरीकांनी रेल्वे मार्गाचा प्रश्न सोडविण्यासाठी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये जनआंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०५-२०१६) :**(१) नाही.
(२) शेगाव-खामगाव-जालना या नवीन रेल्वे मार्गाची लांबी १५५ कि.मी. इतकी असून या रेल्वे मार्गाचा RECT अहवाल दिनांक २१.१.२००२ रोजी रेल्वे बोर्डाला सादर करण्यात आला होता. तद्नंतर RECT अहवाल सन २०१०-११ रेल्वे बोर्डाद्वारे मंजूर करण्यात आला असून सदर रेल्वे प्रकल्पाचा सर्वे रिपोर्ट दिनांक २४/६/२०१० रोजी रेल्वे बोर्डाला सादर करण्यात आला आहे. सदर प्रकल्पाचा एकूण खर्च रु. १०२६.६७ कोटी इतका असून परतावा दर हा (-४.२६) इतका आहे.

शेगांव-खामगाव-जालना रेल्वे मार्गाचा केंद्र शासनाने सन २०१६-१७ च्या भांडवली गुंतवणुक योजनेत समावेश करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जेष्ठ नारगरिकांना दिलेली ओळखपत्रे ग्राहय धरण्याबाबत**

**(१५) २९९०३ (२१-०१-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून प्रसिध्दीत देण्यात आलेल्या पत्रकात ६५ वर्षावरील जेष्ठ नागरिकांना राज्य व केंद्र सरकारने दिलेली ओळखपत्रे राज्य परिवहन महामडळांच्या बसच्या प्रवासभाडे सवलतीसाठी ग्राहय धरण्यात यावीत असे नमूद करण्यात आलेले असतानाही काही वाहक हे जेष्ठ नागरिकांकडून बसभाडे सवलतीसाठी केवळ आधारकार्डाची मागणी करुन अडवणूक करत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परिवहन कर्मचाऱ्यांना राज्य व केंद्र सरकारने जेष्ठ नागरिकांना दिलेली ओळखपत्रे ग्राहय धरण्याबाबत सूचना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१६)** :(१) राज्य परिवहन महामंडळाच्या सवलती उपभोगण्याकरिता आधारकार्ड सक्तीचे राहील अशा आशयाची बातमी दै.लोकसत्ता दि.१९.२.२०१५ व दि. २६.०२.२०१५ मध्ये प्रसिध्द झाली होती. त्यामुळे अनेक नागरिकांच्या लोकप्रतिनिधी व जेष्ठ नागरिकांसाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्था यांच्या तक्रारी आल्या आहेत.

(२) ज्येष्ठ नागरिकांच्या सवलतीबाबत राज्य परिवहन महामंडळाच्या दिनांक २७ फेब्रुवारी, २०१५ च्या पत्रान्वये मागविण्यात आलेले आहे. तसेच राज्य परिवहन महामंडळाच्या सध्याच्या प्रचलित पध्दतीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नसल्याचे राज्य परिवहन महामंडळाद्वारा दि. २३ मार्च, २०१५ अन्वये सर्व विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिकरोड एसटी बसस्थानकातील अस्वच्छता दूर करण्याबाबत**

**(१६) २९९७७ (२०-०१-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने शासनाच्या विविध विभागाकडून विकासकामे, स्वच्छता व सुरक्षिततेची विशेष काळजी घेण्यात येत आहे, मात्र एसटी महामंडळाच्या नाशिकरोड बसस्थानकात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता असून भाविक व प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे माहेऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले हे खरेआहे काय,

(२) असल्यास, या एसटी बसस्थानकातील अस्वच्छता दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-०६-२०१६)** :(१) व (२) सिंहस्थ कुंभमेळा २०१५ च्या अनुषंगाने राज्य परिवहन महामंडळाचे नाशिकरोड येथील पडीक अवस्थेतील उपहारगृह पाण्याचे काम सुरु होते. ऑगस्ट, २०१५ दरम्यान पडीक बांधकाम साहित्याची विल्हेवाट त्वरीत लावण्यात आली व परिसर स्वच्छ करण्यात आलेला आहे.

तसेच सदर बसस्थानकाची स्वच्छता महामंडळाद्वारे व बसस्थानकातील शौचालयाची स्वच्छता परिचालन संस्थेमार्फत करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात औरंगाबाद येथे अलीगढ मुस्लिम विद्यापीठाचे केंद्र स्थापण्याबाबत**

**(१७) ३०८०१ (१२-०१-२०१६). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात औरंगाबाद येथे अलीगढ मुस्लिम विद्यापिठाचे केंद्र खुलताबाद (जिल्हा औरंगाबाद) येथील सर्व्हे नंबर ५, सलीभंजन येथे स्थापण्याबाबतच्या संदर्भात कालबध्द कार्यक्रमाची आखणी व त्याचे कार्यान्वयन तातडीने गठीत करण्याची मागणी राज्यातील अल्पसंख्याक समुदयाकडून, अल्पसंख्याक सेवाभावी संस्था, अल्पसंख्याक समुदायाचे जनप्रतिनिधी यांच्यावतीने मा.मंत्री (अल्पसंख्याक विकास), राज्यमंत्री (अल्पसंख्याक विकास), प्रधान सचिव, (अल्पसंख्याक विकास), विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१५ वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती औरंगाबाद येथे अलिगढ मुस्लिम विद्यापीठाचे केंद्र खुलताबाद (जिल्हा औरंगाबाद) येथील सर्व्हे नंबर ५, सलीभंजन येथे स्थापण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) मौ.सुलीभंजन, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद येथील गट क्र.०५ मधील गायरान जमीन अलिगड मुस्लिम विद्यापीठाच्या उपकेंद्रसाठी प्रदान करण्याबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी शासनास प्रस्ताव सादर केला होता. औरंगाबाद जिल्ह्याच्या प्रादेशिक योजनेस शासनाने मान्यता दिली आहे. सदर जमीन पर्यटन संकुल नकाश्यानुसार ना-विकास क्षेत्रामध्ये समाविष्ट असून तेथे शैक्षणिक वापर अनुज्ञेय होत नसल्याने या प्रयोजनासाठी अनयत्र पर्यायी जमीन उपलब्ध होत असल्यास प्रस्ताव सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना महसूल विभागाच्या दि.१२/०३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळकोट (जि.लातूर) येथे बसस्थानक मंजूर करणे बाबत.**

**(१८) ३०८०५ (१८-०१-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळकोट जिल्हा लातूर हा नवीन तालुका होवून २० वर्ष झाली हा तालुका लातूर व नांदेड जिल्ह्याच्या संलग्नीत असून, येथील दळण-वळणाचे साधन चांगले असूनही या तालुक्यात स्वतंत्र बस स्थानक नसल्यामुळे या तालुक्यातील नागरीकांना त्रास होत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळकोट येथे स्वतंत्र बसस्थानक मंजूर करुन याठिकाणी नवीन बसेस मंजूर करण्याबाबत येथील लोक प्रतिनिधींना निवेदन माहे ऑगस्ट, २०१५ वा त्यादरम्यान दिले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जळकोट येथे स्वतंत्र बसस्थानक मंजूर करुन याठिकाणी नवीन बसेस मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) नवीन बसस्थानक अथवा नवीन बसेस मंजूरीबाबत संदर्भाधिन निवेदन राज्य परिवहन महामंडळास प्राप्त झालेले नाही. जळकोट जि.लातूर येथे १ हेक्टर २१ आर जमिनीवर दि.०७.०७.२००० पासून बसस्थानक कार्यरत असल्याने नवीन बसस्थानक बांधण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात फलोत्पादन व शेडनेट, हरितगृह विकासांसाठी राष्ट्रीय फलोत्पादन अभियान आणि राष्ट्रीय कृषी विकास योजनेबाबत**

**(१९) ३१९९० (१५-०१-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात फलोत्पादन व शेडनेट, हरितगृह विकासांसाठी राष्ट्रीय फलोत्पादन अभियान आणि राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत १०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनुदान वाटपात विदर्भातील शेतकऱ्यांना वेळेवर अनुदान मिळत नसल्याने या प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जावर व्याज भरावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. सन २०१५-१६ मध्ये राज्यात, संरक्षित शेती या घटकासाठी, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियाना अंतर्गत रु.६८५४.४३ लाख व राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत रु.२४८७.५० लाख असे एकूण रु.९३४१.९३ लाख आर्थिक उद्दीष्ट होते.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रेवदंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील अलिबाग आगारा अंतर्गत कार्यरत असलेला बसस्थानक इमारत परिसर सुधारण करण्याबाबत**

**(२०) ३२०३१ (२०-०१-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेवदंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील अलिबाग आगारा अंतर्गत कार्यरत असलेला बसस्थानक इमारत धोकादायक झाल्याने प्रवाशांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत व बसस्थानक परिसर सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासनाने आवश्यक निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०७-२०१६) :**(१) होय.

(२) रेवदंडा येथील बसस्थानकाची इमारत व बसस्थानक परिसराची देखभाल व दुरुस्ती वेळोवेळी राज्य परिवहन महामंडळाद्वारा करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई मध्ये टॅक्सी (कॅब) चे निश्चित दर ठरविण्याबाबत**

**(२१) ३२१८६ (१८-०१-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मध्ये टॅक्सी (कॅब) साठी सरासरी किलोमीटर नुसार किती भाडे आकारले जावे याबाबत निश्चित धोरण नसल्याने विविध दर आकारले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओला व उबेर ह्या टॅक्सी कंपनी कमी दर आकारत असल्याने टॅक्सी संघटनेमध्ये मोठे वाद निर्माण झाले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, टॅक्सी (कॅब) चे निश्चित दर ठरविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. दिवाकर रावते (०५-०६-२०१६) :**(१) मुंबईतील काही-पिवळी टॅक्सी व कूल कॅबचे भाडे हकीम समितीच्या सुत्रानुसार निश्चित केले जाते. प्लीट टॅक्सीचे भाडे राज्य परिवहन प्राधिकरणामार्फत ठरविले जाते दुरिस्ट /लक्झरी टॅक्सीचे भाडे ग्राहक व परवानाधारक यांच्या सोयीनुसार त्यांच्यामध्ये आपसांत ठरविण्यात येते. त्यामुळे विविध टॅक्सी सेवांसाठी विविध दर आकारले जातात.

(२) ओला व उबेर यासारख्या समुच्चयक टॅक्सी कंपन्या काही वेळा काळ-पिवळ्या टॅक्सीपेक्षा कमी भाडे आकारत असल्याबाबतच्या तक्रारी टॅक्सी संघटनेकडून प्राप्त झाल्या आहेत.
(३) मुंबईमध्ये समुच्चयक कंपन्यांमार्फत चालविण्यात येणाऱ्या टॅक्सी सेवेचे नियमन करण्यासाठी "सिटी टॅक्सी स्किम, २०१५" ही नियमावली तयार करुन व ती प्रसिध्द करुन त्यावर सर्वसामान्यांच्या सूचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे प्राप्त झलेल्या सूचनांनुसार सुधारीत केलेला नियमावलीचा मसुदा अंतिम करण्यासाठीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) येथील किणी बसस्थानकात असलेले खड्डे बुजविणेबाबत**

**(२२) ३२५४३ (१८-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) येथील किणी बसस्थानकात मोठ्या प्रमाणात खड्डे झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर बस स्थानकांतील खड्डे बुजविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-०६-२०१६) :**(१) किणी येथे बसस्थानक नसून मार्गनिवारा आहे. सदर मार्ग निवाऱ्याची पाहणी केली असता मार्ग निवाऱ्यात खड्डे नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) कोल्हापूर विभागामार्फत पाहणी केली आहे.
(३) किणी मार्गनिवाऱ्यात खड्डे नसल्याने दुरुस्तीचा प्रश्न येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने एस.टी.भाडे कमी करणेबाबत**

**(२३) ३३०९० (२०-०१-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात डिझेलचे दर काही महिन्यापूर्वी कमी झाले असता महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने एस.टी.भाडे अद्याप कमी केले नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार एस.टीचे भाडे कमी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-०६-२०१६) :**(१) व (२) होय.

(३) डिझेल दरात जरी कपात झालेली असली तरी राज्य परिवहन महामंडळाने वर्ष २०१२-२०१६ चा कर्मचारी वेतनवाढीचा प्रतिवर्ष ५१४ कोटी याप्रमाणे चार वर्षाचा एकूण आर्थिक भार रु. २०५६ कोटी जनतेवर न टाकता कोणतीही प्रवास भाडे वाढ न करता सोसलेला आहे. सद्य:स्थितीत झालेल्या डिझेल दर कपातीपेक्षा कर्मचारी/ अधिकारी वेतनवाढ व पथकराची रक्कम याचा आर्थिक भार फार मोठा आहे.

वरील बाबी विचारात घेता राज्य परिवहन महामंडळास प्रवासीभाडे कमी करणे शक्य होत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील टाटा मॅजिक, मॅकिसमो, मारूती ओमनी, इको यासारख्या वाहनांना टप्पा वाहतुकीस परवानगी मिळण्याबाबत**

**(२४) ३३२८८ (१३-०१-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील टाटा मॅजिक, मारूती ओमनी, इको यासारख्या वाहनांना टप्पा वाहतुकीस परवानगी मिळावी म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर २०१५ रोजी वा त्या दरम्यान मा.सचिव, परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयातील ग्रामीण भागात उक्त वाहनातून मोठया प्रमाणात टप्पा प्रवासी वाहतूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टप्पा वाहतूक परवानगी नसल्यामुळे वाहतूक विभागामार्फत कारवाई होत असल्यामुळे वाहतूक धारकांना भुर्दंड पडून मोठ्याप्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने टप्पा वाहतुकीसाठी परवानगी देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-०६-२०१६) :**(१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) प्रादेशिक परिपहन कार्यालय, पनवेल यांचेकडील वायूवेग पथकामार्फत एप्रिल, २०१५ ते जानेवारी, २०१६ या कालावधीत अशा प्रकारच्या एकूण २६४ वाहनांवर कारवाई केली असून त्यापैकी १६४ वाहनांच्या मालकांकडून दंड वसूल केला आहे.

(४) राज्यामध्ये टप्पा वाहतूकीचे अधिकारी सर्वस्वी राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे (एस.टी.) सोपविण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात १ लाख ४० हजार रिक्षांचे परवाने रद्द झाल्याबाबत

**(२५) ३३३४९ (१८-०१-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १ लाख ४० हजार रिक्षांचे परवाने रद्द झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रद्द झालेल्या रिक्षांचे परवाने १५ हजार घेऊन नुतनीकरण करण्यात येणार असल्याचे परिवहन विभागाने निर्णय घेतला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील परवाने रद्द झालेल्या रिक्षा परवानांचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-०६-२०१६) :**(१) होय.

(२) याचिका क्र.६६४४/२०१५ प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार उशीरा योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणासाठी सहमत शुल्काची कमाल मर्यादा मुंबई महानगर क्षेत्रामध्ये रु.२०,०००/- व राज्यात इतरत्र रु.१५,०००/- इतकी निश्चित करुन वैधता कालावधी संपलेल्या रिक्षा परवान्यांचे नूतनीकरण करण्याची शेवटची संधी संबंधीतांना सन २०१५ अखेर देण्यात आली. ज्या प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष लागू असणारे सहमत शुल्क वरील कमाल मर्यादेपेक्षा कमी होते, त्या प्रकरणी लागू असणारे शुल्कच आकारले गेले.

(३) वरीलप्रमाणे सहमत शुल्क व ऑटोरिक्षा परवाना नूतनीकरण शुल्क आकारुन सोलापूर जिल्ह्यात सोलापूर व अकलूज येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांतर्गत एकूण ७९६ रिक्षा परवान्यांचे नूतनीकरण करण्यात आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दर्यापूर मतदारसंघातील अंजनगाव सुर्जी येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाअंतर्गत डेपो निर्मितीचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(२६) ३३७३० (१८-०१-२०१६). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर मतदारसंघातील अंजनगाव सुर्जी येथे महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळाअंतर्गत डेपो करीता जागा अधिकृत केली असून अजूनपर्यत डेपो निर्मितीचे काम अपूर्ण आहे. अंजनगाव सुर्जी हे व्यापारी शहर आहे. तसेच फळ वर्गीय पिके केळी, संत्रा, भाजीपाला इ.पिके मोठया प्रमाणात घेतात. गाडगे महाराजांचे जन्मस्थान शेंडगाव याच तालुक्यामध्ये आहे. लोकप्रतिनिधी यांनी वारंवार डेपो करण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंजनगाव सुर्जी येथे डेपो करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-०६-२०१६) :**(१) व (२) अंजनगाव सुर्जी येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाअंतर्गत डेपो मंजूरीची मागणी प्राप्त आहे. तथापि, एखाद्या आगाराची नियते १०० पेक्षा अधिक असल्याशिवाय तसेच आगारापासून ३० कि.मी. परिघ क्षेत्रात नविन आगार न उभारण्याबाबत राज्य परिवहन महामंडळाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. अंजनगाव सुर्जी पासून ३० कि.मी. परिघ क्षेत्रात परतवाडा, अकोट व दर्यापूर ही आगारे असल्यामुळे राज्य परिवहन महामंडळाच्या आगार निर्मितीच्या धोरणानुसार अंजनगाव सुर्जी येथे आगार निर्मिती करता येत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथे मंजूर असलेला बसथांबा बांधण्याबाबत**

**(२७) ३३७८७ (२०-०१-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथे मंजूर असलेले बस थांबा अद्यापपावेतो बांधण्यात न आलेल्याबाबत व सदर बसथांबा बांधण्यास विलंब होण्यास कारणीभूत असणा-यांवर कायदेशीर कारवाई होणेबाबत उमरगा-लोहार येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २९ ऑगस्ट, २०१५ रोजी लेखी निवेदनाव्दारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच माकणी येथे मंजूर असलेला बसथांबा बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?,

**श्री. दिवाकर रावते (०१-०७-२०१६) :**(१) व (२) माकणी येथील प्रवासी निवाऱ्याच्या बांधकामासाठी अतिक्रमणविरहीत आवश्यक मोकळी जागा माकणी ग्रामपंचायतीकडून अद्याप राज्य परिवहन महामंडळाच्या ताब्यात दिलेली नाही. त्यामुळे सदरची जागा प्राप्त करुन घेण्याची व सदर जागा प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्ध करुन घेण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील बेरोजगार तरुणांसाठी अडीच लाख रिक्षा परवाने देण्याबाबत**

**(२८) ३४५३२ (१८-०१-२०१६). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेरोजगार तरुणांसाठी अडीच लाख रिक्षा परवाना वितरीत करण्याची घोषणा नुकतीच मा.परिवहन मंत्री यांनी दिनांक १५ सप्टेबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परवाने देण्यासंबंधी शासनाने कोणती नियमावली केली आहे काय,

(३) असल्यास, सदर नियमावलीचे स्वरुप काय असणार आहे,

(४) असल्यास, परवाने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही, दि. १५ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या पत्रकार परिषदेत राज्यातील रद्द/व्यपगत झालेल्या रिक्षा परवान्यांचे नूतनीकरणासाठी एक संधी देण्याची, तसेच मुंबई महानगर क्षेत्रासाठी एक लाख आणि पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नाशिक, औरंगाबाद व नागपूर या महापालिका क्षेत्रांमध्ये सध्या असलेल्या परवान्यांच्या संख्येच्या २५ टक्के परवाने नव्याने जारी करण्याची घोषणा केली होती.

(२) व (३) परवाना प्राप्त करण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांसाठी विहित केलेल्या अटी व शर्तीमधील महत्त्वाच्या तरतूदी पुढीलप्रमाणे -

i) परवाने जारी करताना शासन विहित करेल त्या नियमाप्रमाणे सुधाररीत शुल्क भरणे अनिवार्य.

ii) अर्जदाराकडे रिक्षा चालविण्याची वैध अनुज्ञप्ती व सार्वजनिक सेवा वाहन बिल्ला (बॅज) असावा.

iii) अर्जदारास स्थानिक भाषेचे ज्ञान व परवाना क्षेत्रातील स्थळांची माहिती असावी.

iv) राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षाचे असावे.

v) अर्जदाराविरुध्द मागील एक वर्षामध्ये कोणताही दखलपात्र गुन्हा नोंद झाला नसल्याचा पोलिस विभागाचा दाखला असावा.

vi) अर्जदाराने कुठेही नोकरीत नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे.

vii) मुंबई महानगर क्षेत्रात; तसेच पुणे, नागपूर, नाशिक, सोलापूर व औरंगाबाद या शहरांमध्ये परवान्यावर दाखल करावयाची रिक्षा ही सी.एन.जी./एल.पी.जी. इंधनावर चालणारी असावी. राज्यात अन्य क्षेत्रांमधील रिक्षा पेट्रोलवर चालणाऱ्या असाव्यात.

viii) सर्व रिक्षांना इलेक्ट्रीक मीटर बसविणे अनिवार्य.

ix) सर्व महापालिका क्षेत्रांमध्ये परवान्यावर नोंद करावयाचे वाहन हे नवीन असावे. राज्यात अन्य क्षेत्रांमध्ये परवान्यावर दाखल करावयाचे वाहन पाच वर्षापेक्षा जुने नसावे.

x) भविष्यात शासनाने विहीत केल्यास परवानाधारक ऑटोरिक्षारमध्ये जी.पी.एस./ तत्सम यंत्रणा बसविणे बधनकारक राहील.

xi) शैक्षणिक अर्हतेची कोणतीही अट नाही.

xii) एकूण जारी करावयाच्या परवान्यांच्या संख्येत ५ टक्के परवाने महिलांसाठी राखीव.
(४) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयामार्फत दि. ३१ डिसेंबर, २०१५ रोजी वृत्तपत्रात जाहीरात देवून दि.७ जानेवारी, २०१६ पर्यंत परवाना प्राप्त करण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले. लॉटरी ड्रॉ ची सोडत दि. १२ जानेवारी, २०१६ रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) येथे काढण्यात आली.

लॉटरीत विजयी झालेल्या उमेदवारांना इरादापत्र देण्यासाठीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वाहन चालकांच्या नंबर प्लेटवर नियम डावलून उलटसुलट शब्द दर्शविल्याबाबत**

**(२९) ३४८८३ (१८-०१-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाहन चालकांच्या नंबर प्लेटवर नियम डावलून “दादा, काका, मामा” यासह अनेक उलटसुलट शब्द दर्शविलेले असल्याने आरटीओ किंवा वाहतूक पोलिसांवर हे नंबर वाचणे कठीण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुरक्षेच्या दृष्टीने हे प्रकार धोकादायक आहेत हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा नंबर प्लेट लावणाऱ्या वाहन चालक वा मालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-०६-२०१६) :**(१) व (२) होय.
(३) केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ५० व ५१ मध्ये वाहनांवर नोंदणी क्रमांक विहित पध्दतीने प्रदर्शित करण्यासंदर्भात तरतूद विहीत केली आहे. सदर तरतूदीनुसार वाहनावर नोंदणी क्रमांक लिहिण्यात आला नसेल तर चालक/मालकाविरुध्द मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम १ मधील तरतूदीनुसार दंडात्मक कारवाई करण्यांत येते. त्यानुसार एप्रिल ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत राज्यभरात एकूण ९२९६ इतक्या दोषी वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून रु. ११,२९,१००/- एवढे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा तालुक्यातील पिंपळगाव, नगरदेवळा, भडगाव तालुक्यातील कजगाव या भागात सुसज्ज बसस्थानक होणे बाबत**

**(३०) ३५५७७ (३१-०१-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा तालुक्यातील पिंपळगाव, नगरदेवळा,भडगाव तालुक्यातील कजगाव या भागात शाळा, कॉलेज, शासकीय व निमशासकीय कार्यालये असून तेथील शाळकरी, महाविद्यालयातील विध्यार्थी तसेच कामगार वर्ग पाहता येथे रहदारीकरिता एस. टी. बस शिवाय कोणताच मार्ग नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागात सुसज्ज असे बसस्थानक नसल्याने तेथील विध्यार्थी व प्रवाशांनी सुसज्ज अशा बसस्थानाकांची मागणी केली आहे हेही खरे आहे काय ,
(३) असल्यास, या ठिकाणी सुसज्ज असे बस स्थानक उभारण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०७-२०१६) :**(१) नाही.
(२) कजगांव, नगरदेवळा, पिंपळगांव या गावांमध्ये प्रवासी मार्गनिवारे बांधण्यात आलेले आहेत.
(३) व (४) सदर गावांची वाहतुकीची वर्दळ पाहता सध्यास उपलब्ध असलेले मार्गनिवारे पुरेसे आहेत.

---

**उल्हासनगर शहरासाठी वाहतूक शाखेस अवजड वाहनांसाठी**
**क्रेन व हायड्रा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३१) ३५६४३ (१३-०१-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर हे औधोगिक शहर असल्याने उल्हासनगर शहरात अनेक जड वाहने येत असतात. ती वाहने मध्ये बंद पडत असल्याने मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण होत असते. त्या जड वाहनांना रस्त्याच्या बाजूला काढण्यासाठी उल्हासनगर शाखेला वाहनांसाठी क्रेन व हायड्रा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी मा. लोकप्रतीनिधिनी मा.परिवहन मंत्री यांच्याकडे दिनांक ३०/६/२०१५ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जड वाहने उचलण्यासाठी क्रेन व हायड्रा उपलब्ध नसल्याने शहर वाहतूक शाखेस अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दीर्घकाळासाठी वाहतूक कोंडी निर्माण होऊ नये म्हणून उल्हासनगर शहर वाहतूक शाखेने सदर वाहने उपलब्ध करून देण्यासाठी शासन तसेच मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाच्या वतीने सदर शहर वाहतूक शाखेस वाहने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

उल्हासनगर शहराकरीता महानगरपालिकेने वाहतूक विभागास दोन टोईंग व्हॅन करारावर उपलब्ध करुन दिल्या आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
(४) उल्हासनगर वाहतूक शाखेस अवजड वाहने उचलण्याकरीता क्रेन व टोईंग व्हॅन उपलब्ध करुन देण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेकडून मे.प्रथमेश मल्टी प्रोजेक्ट प्रा.लि. सोबत करार करण्यात आला असून त्यांच्याकडून वाहतूक विभागास दोन टोईंग व्हॅन करारावर उपलब्ध करुन दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील शहरापूर एस.टी. डेपोच्या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत**

**(३२) ३५९०६ (२०-०१-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील शहरापूर एस.टी. डेपोच्या इमारतीला पावसाळ्यात (जून २०१५) मध्ये मोठ्या प्रमाणात गळती लागून अद्याप सदर इमारतीची दुरुस्ती करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच तातडीने सदर आगाराच्या इमारतीस गळती असलेले काम तातडीने कारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यत येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) बसस्थानकातील पावसाच्या पाण्याची गळती थांबविण्यासाठी बसस्थानकावर पत्र्याची शेड बांधण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शहरापूर (जि.ठाणे) येथील राष्ट्रीय परिवहन मंडळ आगाराचे नुतणीकरण करण्याची केलेली मागणी**

**(३३) ३५९३६ (२०-०१-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहरापूर (जि.ठाणे) येथील राष्ट्रीय परिवहन मंडळ आगाराचे नुतणीकरण करण्याची मागणी मा.विभागीय नियंत्रक महामंडळ, ठाणे यांचेकडे शहापूर येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०७-२०१६) :**(१) होय.
(२) सरदार पटेल इंजिनिअरींग कॉलेज, अंधेरी यांचेकडून दिनांक २६.०१.२०१६ रोजी शहापूर बसस्थानक इमारतीचे रचनात्मक लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करुन घेण्यात आले असून सदरचा अहवाल अद्यापी महामंडळास अप्राप्त आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्हयातील सन १९७६ पूर्वीच्या गिरणा प्रकल्पातील पुनर्वसित गावठानातील पुरवावयाच्या नागरी सुविधांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत

**(३४) ३६४९६ (१३-०१-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील सन १९७६ पूर्वीच्या गिरणा प्रकल्पातील पुनर्वसित गावठानातील पुरवावयाच्या नागरी सुविधांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक या कार्यालयाने ३१/७/२०१४ रोजी व त्यासुमारास सचिव (म. व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांच्याकडे सादर केलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गिरणा प्रकल्पातील सन १९७६ पूर्वीच्या पुनर्वसित गावाठांनामध्ये पुरवावयाच्या नागरी सुविधांच्या प्रस्तावांना प्रशासकीय मंजुरी देणेबाबतची मागणी लेखी निवेदनाद्वारे नांदगाव मतदार संघातील विधानसभा सदस्यांनी दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी व त्यासुमारास माननीय महसूल, मदत कार्य व पुनर्वसन मंत्री यांच्याकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करीत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) नियोजन विभागाने प्रस्तावित केलयानुसार योजनांतर्गत योजनेचा आढावा घेवून सन २०१४-२०१५ मध्ये मुल्यामापन समितीस प्रस्ताव सादर करण्यात आला होता, त्यामुळे, तसेच पुरेशा निधीअभावी त्या कालावधीत पुनर्वसनाच्या नागरी सुविधा कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली नव्हती, तथापि आता सन २०१६-१७ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यासाठीची

कार्यवाही सुरु करण्यात आली असून त्या अनुषंगाने सद्यस्थितीत प्रशासकीय मान्यतेस्तव प्राप्त परंतू जुन्या दरसुचीवर आधारित असलेली अंदाजपत्रके चालू दरसूचीनुसार परिगणित करुन फेरसादर करण्याचे निदेश प्रकल्पयंत्रणेस देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### महागांव (जि.यवतमाळ) येथे परिवहन विभागामार्फत महिन्यातून दोन वेळा आरटीओ कॅम्प होण्याबाबत

**(३५) ३७९२७ (२०-०१-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाव (जि.यवतमाळ) येथे वाहनाची प्रचंड संख्या वाढत असून महागाव हे तालुक्याचे ठिकाण असल्याने येथील नागरिकांना दुचाकी व चारचाकी वाहनाची नोंदणी करण्यासाठी इतर ठिकाणी जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुसद व उमरखेड प्रमाणे महागाव येथे महिन्यातून दोन वेळा परिवहन विभागामार्फत तात्काळ प्रादेशिक परिवहन कॅम्प सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०७-२०१६) :**(१) होय.

(२) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, यवतमाळ यांचेमार्फत महिन्यातून पुसद येथे ०२ तसेच उमरखेड येथे ०१ मोटार वाहन निरिक्षकाच्या शिबिर दौऱ्याचे नियमितपणे आयोजन केले जाते. महागाव येथून उमरखेड व पुसद हे अंतर ३० कि.मी. पेक्षा कमी आहे. या ठिकाणी महागाव तालुक्यातील नागरिकांचे वहन नोंदणीचे कामकाज करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### दारव्हा (जि.यवतमाळ) तालुक्यात केळीचे पीक उद्ध्वस्त झाल्याबाबत

**(३६) ३८८४५ (१५-०१-२०१६). श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारव्हा (जि.यवतमाळ) तालुक्यात दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजी जोरदार वाऱ्यासह आलेल्या पावसाचा फटका केळींच्या बागांना बसला असून गणेशपूर, बिजोरा, कुंभारकिन्ही, किन्ही वडकी, टाकळी बोध, गाजेपूर या गावांना फटका बसला असून केळीचे पीक उद्ध्वस्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कोणत्या स्वरुपाची मदत करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१५)** :(१) व (२) होय.
(३) याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रासायनिक खतांच्या वापरामुळे कोकणातील शेतजमिनीची सुपिकता ढासळत असल्याबाबत**

**(३७) ३९९०५ (२८-०४-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील शेतजमिनीची सुपिकता रासायनिक खतांच्या वापरामुळे कमी होत चालली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हयातील जमिनीची सुपिकता कमी होत असल्याची बाब माहे डिसेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा कृषी विभागाच्या मृदा संधारण विभागाने केलेल्या सर्वेक्षणातून समोर आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जमिनीचा पोत सुधारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) नाही.
(३) जमिनीचा पोत सुधारण्यासाठी मृद आरोग्य पत्रिका वाटपाचा कार्यक्रम राबविण्यात येत असून सदर कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व खातेदार शेतकऱ्यांना शासनामार्फत मृद आरोग्य पत्रिकांचे वाटप करण्यात येत आहे. रत्नागिरी जिल्हयात सन २०१५-१६ मध्ये १०५७५१ शेतकऱ्यांना मृद आरोग्य पत्रिकांचे वाटप करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कापूस लागवडीसाठी लागणारे बियाणे, फवारणी खते यामुळे उत्पादन खर्चात झालेली वाढ.**

**(३८) ४०१०६ (२८-०४-२०१६). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कापूस लागवडीसाठी लागणारे बियाणे, फवारणी,खते तसेच उत्पादन खर्चात दुप्पट, चौपट वाढ होणे, तसेच रासायनिक खतांचा वापर मोठया प्रमाणात झाल्याने जमिनीचा पोत बिघडणे, तसेच नैसर्गिक परिस्थितीमुळे उत्पादनात घट आदिमुळे कापूस लागवडीसाठी उत्पादन खर्चात कमालीची वाढ झालेली आहे हे खरे आहे काय,
(२) तसेच, कापसाला जागतिक बाजारपेठेतील दरानुसार क्विंटलमागे चार हजारांपर्यंत भाव मिळत आहेत हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्या तीन वर्षापासूनची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन राज्य शासनाने प्रति क्विंटल एक हजार ते दोन हजारापर्यंत बोनस देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, विचाराधीन प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :**(१) नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे कमी अधिक प्रमाणात नुकसान झाले आहे. राज्यात सुमारे ९८ टक्के क्षेत्र बीटी कापसाखाली असून मागील काही वर्षापासून राज्य शासनाने बियाण्याचे दर नियंत्रित करुन उत्पादन खर्चावर नियंत्रण आणले आहे.

(२) केंद्र शासनाने सन २०१५-१६ या हंगामाकरीता रु.४१००/- प्रति क्विंटल इतकी आधारभूत किंमत कापसासाठी जाहिर केली असून केंद्र शासनाने जाहिर केलेल्या किमान आधारभूत दराने भारतीय कपास निगमचे उप अभिकर्ता म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाने राज्यात कापूस खरेदी केला आहे.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भुसावळ तालुक्यातील अल्पसंख्यांक मुलींना शैक्षणिक शुल्क तातडीने देण्याबाबत

**(३९) ४०३२८ (२८-०४-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्याक विभागाकडून अल्पासंख्याक मुलींना शैक्षणिक शुल्क देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुसावळ तालुक्यातील अल्पसंख्यांक मुलींना गेली २ वर्षे शैक्षणिक शुल्के मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पनवेल येथील कार्यालयास पर्यायी जागा मिळण्याबाबत

**(४०) ४०४४५ (२८-०४-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल राज्य उत्पादन शुल्क विभागीय कार्यालायाबरोबर भरारी पथकाच्या गेल्या वीस वर्षापासून एकाच ठिकाणी असलेल्या पनवेल येथील कार्यालयाची भाड्याची जागा खाली करण्याची नोटीस इमारत मालकाने दिल्याचे माहे जानेवारी, २०१६ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाड्याकरिता भाडेकरार पावती शासनाने सक्तीची केल्यामुळे गेल्या सात महिन्यापासून भाडे थकल्यामुळे इमारत मालकाने जागा खाली करण्यास सांगितले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जप्त केलेली बेकायदा दारू व दारूची अनधिकृत वाहतूक करणारी वाहने ठेवण्यासाठी जागा अपुरी पडत असल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पनवेल शहरात पर्यायी जागा मिळत नसल्याने संबधित विभागाने कार्यालयास जागा मिळण्यासाठी सिडको प्रशासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त विभागास कायमस्वरूपी जागा मिळण्यासाठी शासानाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१६) :**(१) होय.

(२), (३), (४) व (५) निरीक्षक, भरारी पथक, परवेल कार्यालयाचे माहे फेब्रुवारी, २०१६ पर्यंतचे भाडे जागा मालकास अदा करण्यात आले आहे. सदर कार्यालयाकरीता जागा अपुरी पडत असल्याने पर्यायी जागा मिळण्यासाठी सिडको प्रशासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच स्थानिक पातळीवर संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून कायमस्वरुपी जागा मिळण्याबाबत निरीक्षक, राउशु, भरारी पथक, पनवेल यांना आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्या स्तरावरुन कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बोरीवली उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये पूर्ण क्षमतेने भरारी पथके, कर्मचारी वर्ग, आधुनिक साधन सामुग्री नसल्याबाबत

**(४१) ४०४७९ (२८-०४-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये पूर्ण क्षमतेने भरारी पथके, कर्मचारी वर्ग, आधुनिक साधन सामुग्री नसल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे अनधिकृत रिक्षा, अनधिकृत पार्किंग, जड वाहने यांच्यावर कारवाई करण्यास बोरीवली उप प्रादेशिक परिवहन कार्यालय असमर्थ असल्याने नागरिकांचे अतोनात हाल होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भरारी पथकांची संख्या वाढवणे, पुरेसा कर्मचारी वर्ग भरणे, आधुनिक साधन सामुग्री पुरविणे इ. बाबत स्थानिक लोकप्रतिनिधिनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कार्यालयामध्ये भरारी पथकांची संख्या वाढविणे, पुरेसा कर्मचारी वर्ग भरणे, आधुनिक साधन सामुग्री पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१६) :**(१) व (२) दिनांक ३०.०४.२०१६ रोजी बोरिवली उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील मंजूर, भरलेली व रिक्त पदांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे:

| गट | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| अ | १४ | १३ | ०१ |
| ब | ०१ | ०१ | ०० |
| क | ५० | २६ | २४ |
| ड | ०६ | ०३ | ०३ |
| एकूण | ७१ | ४३ | २८ |

रिक्त पदांचे कामकाज उपलब्ध अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत करण्यात येत आहे.
(३) व (४) रिक्त पदे भरण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे आरटीओ कार्यालयात किरकोळ कामांसाठी मनमानी रक्कम वसूल करून नागरिकांची लूट करण्याचा दलालांचा धंदा सुरू असल्याबाबत**

**(४२) ४१२६४ (२८-०४-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात दलालाशिवाय काम होणारच नाही, अशी व्यवस्था झाली असल्याने किरकोळ कामांसाठी मनमानी रक्कम वसूल करून नागरिकांची लूट करण्याचा दलालांचा धंदा जोमाने सुरू असल्याचे माहे जानेवारी २०१६ दरम्यान निदर्शनास आल्याचे खरे आहे काय,
(२) असल्यास, दलालांबाबत अद्याप कोणतेही ठोस धोरण जाहीर न झाल्यानेच नागरिकांची लूट पुन्हा सुरू झाली असल्याचे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिक स्वत:हून काम घेऊन गेल्यास त्याचे काम वेळेत होणार नाही, याची 'दक्षता' घेऊन स्वत: अर्ज सादर केलेल्या नागरिकांच्या चुकाच काढल्या जातात परंतु दलालाकडून अर्ज आल्यास ते काम मात्र तातडीने पूर्ण होत असल्याचे चित्र सर्रास पाहायला मिळते त्यामुळे नाइलाजास्तव नागरिकांना दलालाकडे वळावे लागत आहे हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांनी नागरिकांच्या सोयीसाठी पुढील पावले उचलली आहे.

(अ) नागरिकांनी स्वत:ची कामे स्वत: करुन घ्यावीत, दलालाकडे जाऊ नये याबाबत वृत्तनिवेदने प्रसिध्द करण्यात आली आहे.

(ब) नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र मार्गदर्शन कक्ष सुरु करण्यात आला आहे.

(क) शिकाऊ लायसन्स व पक्क्या लायसन्ससाठी ऑनलाईन अपॉईंटमेंट प्रणाली कार्यान्वित असल्याने नागरिकांना दलालाकडे जाण्याची आवश्यकता राहीलेली नाही. तसेच शिकाऊ व पक्क्या लायसन्सची चाचणी मानवी हस्तक्षेपाशिवाय व संगणक प्रणालीयुक्त असल्याने परदर्शकता येण्यास मदत झाली आहे.

(ड) नागरिकांना विविध खिडक्यांवर जावे लागू नये यासाठी एक खिडकी योजना लागू करण्यात आली आहे.

(ई) ड्रायव्हिंग लायसन्स व नोंदणी प्रमाणपत्र नागरिकांना पोचदेय नोंदणीकृत डाकेद्वारे पाठविण्यात येते, त्यामुळे नागरिकांना घरपोच सेवा मिळते व त्यासाठी कोणावर अवलंबून रहावे लागत नाही.

(फ) विविध कामासाठी लागणारे नमुना अर्ज कसे भरायचे आणि सोबत कोणती कागदपत्रे सादर करावयाची याची सविस्तर माहिती देणारे फलक प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्या आवारात लावण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे-मनमाड-इंदूर (जि.धुळे) रेल्वेमार्गाचा प्रस्ताव अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत..**

**(४३) ४१५६८ (१७-०५-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे-मनमाड-इंदूर (जि.धुळे) रेल्वेमार्ग होण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे अनेक वर्षापासून प्रलंबित असून या मागणीकडे शासन दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित रेल्वेमार्ग महत्त्वाचा असून तो मंजूर करण्यासाठी शासनाने केंद्र शासनाकडे कोणत्या स्वरुपाचा पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-०६-२०१६) :**(१) नाही.
(२) या प्रकल्पास सन २०१६-१७ च्या रेल्वे अर्थसंकल्पात मंजूरी देण्यात आली असून त्यामध्ये महाराष्ट्र शासनाचा ५० टक्के सहभाग आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू-घोलवड मार्गावर एस.टी.सेवा सुरु करण्याबाबत..**

**(४४) ४१६८६ (२८-०४-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू - घोलवड मार्गावरील एस.टी.सेवा बंद असल्यामुळे बोर्डी येथे शाळा व महाविद्यालयांमध्ये शिकणा-या शेकडो विद्यार्थ्यांचे फार मोठे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, सदर मार्गावर एस.टी. सेवा तात्काळ सुरु करण्यात यावी अशी मागणी विद्यार्थी आणि पालकांनी डहाणू बस आगार व्यवस्थापकांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय.
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान पाहता तात्काळ एस.टी. सेवा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०७-२०१६) :**(१) नाही.
(२) होय.
(३) व (४) डहाणू आगारातील डहाणू-घोलवड-बोर्डी मार्गावर ५४ फेऱ्या चालनात असून त्यांचा प्रवासी व विद्यार्थी लाभ घेत आहेत.

डहाणू-घोलवड मार्गावरील पूल दि.२२.११.२०१५ रोजी खचल्याने रस्ता वाहतुकीस बंद झाल्यानंतर पर्यायी रस्त्याने मिडी बससेवा सुरु करण्यात येऊन प्रवाशांची व विद्यार्थ्यांची सोय करण्यात आली. संबंधित मार्गावरील पूलाचे काम पूर्ण झाल्यानंतर दि.२६.०१.२०१६ पासून राज्य परिवहन सेवा पूर्ववत सुरु करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कापूस व फळबाग क्षेत्राला अनुदान न देता सोयाबीन पिकाला प्राधान्य दिल्याबाबत**

**(४५) ४२०४१ (२३-०४-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर ता.जि.औरंगाबाद हा १०० टक्के दुष्काळावर मात करण्यासाठी शासनाने औरंगाबाद जिल्ह्याला १०७.२८ कोटी रुपये अर्थसहाय्य वितरीत केले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यंदा शासनाने कापूस व फळबाग क्षेत्राला अनुदान न देता सोयाबीन पिकाला प्राधान्य दिलेले आहे मात्र वैजापुर तालुक्यातील सोयाबीनचे क्षेत्र शून्य आहे तसेच या तालुक्यातील १०० पेक्षा जास्त प्रस्ताव अजून मंजूरीसाठी प्रलंबित असून शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) शासन निर्णय दि.२.३.२०१६ अन्वये खरीप २०१५ मधील औरंगाबाद, नाशिक, अमरावती व नागपूर विभागातील कापूस, अमरावती व नागपूर विभागातील सोयाबीन व नागपूर विभागातील धान या पिकांसाठी शासनाने विशेष मदत जाहिर केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विशेष मोहिम राबवून मदत वाटपाचा आढावा**
**घेण्यासाठी समित्या स्थापन करण्याबाबत**

**(४६) ४२२५६ (२८-०४-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्यावर्षीच्या खरिपातील शेतपिकांच्या नुकसानीपोटी शासनाने पहिल्या टप्प्यात दोन हजारकोटी रुपयांच्या मदतीचे वाटप जाहीर केले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने विशेष मोहिम राबवून मदत वाटपाचा आढावा घेण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी अध्यक्षतेखाली समिती स्थापन करणार आहे, हे ही खरेआहे काय,

(३) असल्यास, सदर समित्या स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुस्लीम आरक्षणाला दिलेल्या स्थगितीविरूध्द सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याबाबत

**(४७) ४२७१६ (२८-०४-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मराठा आरक्षणाला दिलेल्या स्थगितीबाबत ज्याप्रमाणे सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यात आले त्याचप्रमाणे मुस्लीम आरक्षणाला दिलेल्या स्थगितीबाबत सुध्दा सर्वाेच्च न्यायालयात अपील करण्यात येण्याकरिता मा. मुख्यमंत्री यांना दि.९.१२.२०१४ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) होय.
(२) सामान्य प्रशासन विभाग, दि.९ जुलै, २०१४ रोजीच्या अध्यादेशाद्‌वारे मुस्लिम समाजासठी नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी ५% आरक्षण देण्यात आले हाते. याबाबत मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. मा.उच्च न्यायालयाने दि.१४/११/२०१४ रोजी अंतरिम निर्णय दिला आहे व सदर अध्यादेशाद्‌वारे दिलेले शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आले आहे. तसेच व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेल्या आरक्षणाला स्थगिती दिली आहे. सदर अध्यादेशाचे दि.२३/१२/२०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने व्यपगत झाला. या प्रकरणी ॲड. जनरल यांचे मार्गदर्शन घेण्यात आले. सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात अंतीम निर्णयासाठी प्रलंबित आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाचा अंतीम निर्णय झाल्यावर पुढील आवश्यक ती कार्यवाही करणे योग्य होईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईतील चेंबूर कॅम्प ते आर सी मार्ग परिसरात सुरु असलेल्या खोदकामामुळे या मार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

**(४८) ४३१६३ (२८-०४-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर कॅम्प ते आर सी मार्ग परिसरात सुरु असलेल्या खोदकामामुळे या मार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील वाहतूकीची कोंडी हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

आर.सी.मार्ग अरुंद असून, या मार्गाचे क्राँक्रिटीकरणाचे काम सुरु होते. तसेच या मार्गावरील पिण्याचे पाईप लाईन व नाल्याचेही काम सुरु असल्याने वाहतुकीची कोंडी होत होती.

(२) आर.सी. मार्गावरील वाहतूक कोंडी दूर करण्याकरीता १ अधिकारी व व ५ अंमलदारांचे एक पथक क्रेनसह नेमण्यात आले असून वाहतूकीला अडथळा करणाऱ्या व पार्किंग करणाऱ्यां वाहनांवर सन २०१५ मध्ये २०६८ व ८/६/२०१६ अखेर मध्ये ७१३ केसेस करण्यात आल्या आहेत. तसेच दि.१९.१.२०१६ ते ३१.५.२०१६ या कालावधीत सर्व प्रकारच्या वाहनांना पूर्व मुक्त मार्गावरील जिजामाता नगर ते पांजरपोळ जंक्शन पर्यंत जाण्यास सकाळी ७.०० ते १७.०० वाजेपर्यंत आणि पांजरपोळी जंक्शन ते म्हैसूर मोनोरेल स्टेशनपर्यंत सकाळी ११.०० ते २०.०० वाजेपर्यंत पूर्व मुक्त मार्गावरुन प्रवास करण्यास परवानगी देण्यात आली होती या रस्त्यावर पार्किंग होऊ नये याकरीता मोटार सायकल रायडर व अधिकारी/कर्मचारी यांना गस्ती दरम्यान पार्किंग झालेल्या वाहनांवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर रब्बी हंगाम पिक विम्याची रक्कम तातडीने जमा करण्याबाबत**

**(४९) ४३४३१ (२८-०४-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दुष्काळामध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांना नविन रब्बी हंगाम सुरु झाला तरी मागील वर्षीच्या सन २०१४-१५ च्या रब्बी पिक विमा योजनेची नुकसान भरपाई अद्‌याप देण्यात आली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हंगामातील नुकसान भरपाई निश्चित करतांना रब्बी पिकांच्या कापणी प्रयोगांवर आधारित सरासरी उत्पनाची आकडेवारी भारतीय कृषी विमा कंपनीला ३० जुलै २०१५ पुर्वी कृषी विभागाकडून सादर करण्यात आली हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विमा योजनेत सहभागी शेतकऱ्यांना पिक संरक्षण कालावधी संपल्यानंतर ५४ दिवसांच्या आत नुकसान भरपाई मिळणे अपेक्षित आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर रब्बी हंगाम २०१४-१५ मधील पिक विम्याची रक्कम तातडीने जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

राष्ट्रीय कृषी विमा योजनेमध्ये रब्बी हंगाम २०१४-१५ मध्ये राज्यातील एकूण ११.१६ लाख शेतकऱ्यांनी रु. २१.८२ कोटी विमा हप्ता भरुन सहभाग घेतला होता. त्यापैकी ६.८४ लाख शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले. पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना रु. २१०.९३ कोटी नुकसान भरपाई कृषी विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे.
(२) होय, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार रब्बी हंगामातील पिकांची पी कापणी प्रयोगांची सरासरी उत्पन्नाची आकडेवारी भारतीय कृषी विमा कंपनीस दि. ३१ जुलैपर्यंत पाठविणे आवश्यक आहे.
(३) प्रत्येक हंगामात पीक कापणी प्रयोगाची सरासरी उत्पन्नाची आकडेवारी विहित वेळेत आयुक्तालयामार्फत भारतीय कृषी विमा कंपनीला पाठविण्यात येते व सदरची आकडेवारी प्राप्त झाल्यानंतर भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई निश्चित केली जाते.
(४) राष्ट्रीय कृषी विमा योजनेअंतर्गत रब्बी हंगामात २०१४-१५ मध्ये रु. २१०.९३ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आली होती. भारतीय कृषी विमा कंपनीने नुकसान भरपाई रक्कम संबंधित बॅकामार्फत पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्रामुख्याने दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा लाभ देण्याबाबत**

**(५०) ४४२७२ (२८-०४-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गेले काही वर्षापासून सातत्याने दुष्काळ आणि अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाईची हमी देणारे महत्वाकांक्षी नव्या पीक विमा योजनेस केंद्र सरकारने दि. १३.१.२०१६ रोजी मंजूरी दिली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू नव्या पिक योजनेचे स्वरुप काय आहे, त्यानुसार राज्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना कोणत्याप्रकारे लाभ मिळणार आहे, त्याकरीता किती रुपये निधीची केंद्र तथा राज्य सरकारने तरतूद केली आहे,
(३) तसेच, राज्यातील प्रामुख्याने दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना सदरहू योजनेचा गावोगावी संपर्क होवून लाभ देण्याच्या दृष्टीने अद्याप शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१६) :**(१) केंद्र शासनाने खरीप हंगाम २०१६ पासून नवीन महत्वाकांक्षी प्रधानमंत्री फसल विमा योजना (PMFBY) लागू करण्यास मंजूरी दिलेली आहे, हे खरे आहे.

(२) नैसर्गिक आपत्ती, आग, वीज कोसळणे, गारपीठ चक्रीवादळ, पूर, दुष्काळ, पावसातील खंड, कीड व रोग इत्यादीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना विमा सरंक्षण देण्यात येणार आहे. सदर योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी भरावयाचा खरीप हंगामासाठी विमा हप्त्याचा दर २%, रब्बी हंगामासाठी १.५%, तर नगदी पिकांसाठी ५%, इतका आहे. विमा हप्त्यातील उर्वरित रक्कम राज्य शासन तसेच केंद्र शासनाद्वारे प्रत्येकी ५०% याप्रमाणात भरणा करण्यात येणार आहे. हंगामातील प्रतिकुल परिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीसंदर्भात त्याचप्रमाणे, पीक पेरणी पूर्व व काढणी पश्चात नुकसानीसंदर्भात, भरपाई देण्याची तरतुद पण सदर योजनेत आहे.

(३) योजनेच्या मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या असून योजने विषयी प्रचार, प्रसिध्दी क्षेत्रीय कार्यालयामार्फत सुरु आहे. जिल्हा स्तरावरील कृषी विज्ञान केंद्राच्या मदतीने योजनेच्या प्रचार प्रसिध्दीसाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. य योजनेकरिता ई. निविदा प्रक्रीयाद्वारे विमा कंपन्याची नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.